मुंबई विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**

पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२४-२५/१०६२
दिनांक : ०५.१२.२०२४

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : सन २०२४-२५ मधील विशेष शिबिरांच्या आयोजनासंदर्भात.....**

**संदर्भ:** १.राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संदर्भ पत्र क्र. रासेयो/ईसीडी/२०२३-२४/१००४, दिनांक ११.१२.२०२४ रोजीचे पत्र.
२. रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.रासेयो-२०२४/प्र.क्र. ७५/रासेयो कक्ष, दिनांक ०३ डिसेंबर, २०२३ रोजीचे पत्र.
३. राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. राकुकका/ बाल आरोग्य/कक्ष १५ क/NSS विशेष शिबिर आयोजन/५३३७८-४५०/ २०२४, दिनांक २५.११.२०२४ रोजीचे पत्र.

महोदय/ महोदया,

उपरोक्त संदर्भ पत्र क्र.१ नुसार राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत महाविद्यालयीन स्तरांवर आयोजित सात दिवशीय विशेष शिबिराचा आयोजना संबंधी मार्गदर्शक/सुचना आपणांस कळविण्यात आले आहे., तसेच सन २०२४-२५ च्या विशेष शिबिराचे आयोजन दिनांक ०१.११.२०२४ ते ३१.०१.२०२५ या दरम्यान करण्यात यावे असे मा. राज्य संपर्क अधिकारी यांनी कळविले आहे.

केंद्र शासनाकडून सन २०२४-२५ या वर्षांसाठी विशेष शिबिरासाठी थीम "Youth for My Bharat" व "Youth for Digital Literacy" कळविण्यात आली आहे, त्याची शिबिरे आयोजना दरम्यान अमंलबजावणी व्हावी व गावस्तरांवर विविध उपक्रम राबविण्यात यावेत. उदा. शोष खड्डे/पाझर खड्डे तयार करणे, बाल विवाह रोखण्यासाठी समाजप्रबोधन करणे, शिबिरातील सहभागी युवकांची तसेच गावातील किशोरवयीन मुला-मुलींची अनेमिया (रक्तक्षय) बाबत तपासणी व जनजागृती इत्यादी विशेष कृती कार्यक्रम राबविण्यात यावेत.

विशेष शिबिरात सहभागी स्वयंसेवकांची तसेच गावातील किशोरवयीन मुलां-मुलींची (रक्तक्षय) अनेमिया तपासणी करणेकरिता आवश्यक ते सहकार्य करण्याबाबत मा. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य यांनी उपरोक्त संदर्भ पत्र क्र.३ नुसार सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (जिल्हा परिषद) आणि जिल्हा शल्य चिकित्सक यांनी कळविले आहे. पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

याबाबत आपणांस सुचित करण्यात येते की, महाविद्यालयाद्वारे आयोजित सात दिवशीय विशेष शिबिरांमध्ये, तसेच आपल्या दत्तक वस्ती/गाव येथे आरोग्य विभागाच्या सहाय्याने सहभागी स्वयंसेवक व गावातील मुला-मुलींसाठी अनेमिया (रक्तक्षय) चाचणी करून घ्यावी व त्याबाबतचा अहवाल खालील नमुन्यात या कार्यालयास सादर करावा

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **रासेयो विशेष शिबिरांमध्ये अनेमिया (रक्तक्षय) तपासणी अहवाल** | | | | | | | |
| **महाविद्यालयाचे नाव :—** | | | | | | | |
| **विशेष शिबिर आयोजित करण्यात आलेल्या गावाचे नाव :—** | | | | | | | |
| **तालुका :—** | | | **जिल्हा :—** | | | | |
| **दिनांक :—** | | | | | | | |
| **अ. क्र.** | **अनेमिया (रक्तक्षय) तपासणी करण्यात आलेल्या युवक/युवतीचे नाव** | **स्त्री/ पुरूष** | **वय** | **पत्ता** | **संपर्क क्रमांक** | **रक्त गट** | **अनेमिया (रक्तक्षय) टेस्ट रीपोर्ट हिमोग्लोबिन ((gm/dL)** |
| | | | | | | | |
| | | | | | | | |



**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

**सोबत : उपरोक्त संदर्भ पत्र.**

**प्रत :** राष्ट्रीय सेवा योजना, राज्य संपर्क अधिकारी, रासेयो, महाराष्ट्र शासन.

मुंबई विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**


पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२३-२४/१००४
दिनांक : ११.१२.२०२३

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर आयोजनाबाबत...**
**संदर्भ :** रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.रासेयो-२०२३/प्र.क्र.२०९ /साशि-७, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२३ रोजीचे पत्र.

महोदय/ महोदया,

उपरोक्त संदर्भ पत्रानुसार राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष शिबिरासाठी मंजूर विद्यार्थी संस्थेनुसार (नोंद विद्यार्थ्यांच्या ५०% विद्यार्थी संख्या) दरवर्षी शिबिर आयोजीत करणे अनिवार्य आहे. साधारणता वर्षातून एकदा सात दिवसांचे निवासी शिबिर महाविद्यल्याने दत्तक घेतलेल्या गाव/वस्ती मध्ये नोव्हेंबर ते जानेवारी या हिवाळी ऋतू मध्ये आयोजन करण्यात येते. राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवकांना २ वर्षांमध्ये प्रति वर्षी १२० तास म्हणजे एकूण २४० तास व दोन्ही वर्षांत मिळून एक सात दिवसीय निवासी शिबिर करणे अनिवार्य आहे.

शिबिरासंबंधी काही सुचना खालीलप्रमाणे

- शिबिर सुरू होण्यापूर्वी किमान १५ दिवस आधी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व जिल्हा समन्वयक यांना लेखी कळविणे आवश्यक आहे.
- राष्ट्रीय सेवा योजना नोंद विद्यार्थ्यांच्या ५०% विद्यार्थी शिबिरास उपस्थित राहणे आवश्यक आहे.
- शिबिर संपन्न झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल योग्य त्या नमुन्यामध्ये विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षास सादर करणे आवश्यक आहे.
- शिबिर स्थळावर विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी योग्य त्या आवश्यक सुविधा उपलब्ध असाव्यात.
- शिबिरामध्ये सहभागी विद्यार्थी मुले व मुली असल्याने शिबिरात कार्यक्रम अधिकारी पुरूष व महिला यांना सातही दिवस उपस्थित राहणे बंधनकारक आहे. व त्यांची स्वाक्षरी असलेली हजेरी पत्रक/नोंद वही शिबिरस्थळी उपलब्ध असावी.
- शिबिर स्थळी योग्य ती शिस्त राखली जावी व ग्रामस्थांना शिबिराचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.
- शिबिर कालावधी, उपक्रम, इत्यादींची माहिती संबंधीत ग्रामपंचायत, ग्रामसेवक, पोलीस स्टेशन, सरकारी दवाखाना इत्यादींना देणे आवश्यक आहे.
- शिबिर कालावधी दरम्यान संबंधीत गाव/वस्ती यांना उपयोगी उपक्रम तसेच शासनाच्या उपयुक्त योजना/उपक्रम राबविण्यात यावेत.
- शिबिर उपक्रमात 'श्रमप्रतिष्ठा' उपक्रमासमवेत एकात्मीत ग्राम/वस्ती विकास व विद्यार्थ्यांचे नेतृत्व/कौशल्य विकास उपक्रमाचा समावेश असावा.

- ग्राम विकास योजना, स्वच्छता अभियान इत्यादी उपक्रमात गावातील/वस्तीतील युवक/युवती यांचा सहभाग घ्यावा.
- रासेयो वार्षिक विशेष शिबिर हे महाविद्यालयांच्या परिसरात आयोजित करण्यात येऊ नये, महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमासाठी दत्तक घेतलेले गाव/खेडे/वस्ती येथे विद्यार्थ्यांनी शिबिरासाठीचे उपक्रम करणे व वास्तव्यास असणे आवश्यक आहे.
- शिबिर दरम्यान अर्धवट राहिलेले प्रकल्प/उपक्रमांचा पाठपुरावा नियमित कार्यक्रम अंतर्गत घेणे शक्य आहे.
- शिबिरादरम्यान शिबिरार्थीना सकस, साधे व संतुलित आहार पुरविण्यात यावा. स्थानिक भाज्या साहित्यां इत्यादीचा वापर व्हावा व या प्रक्रियेत शिबिरार्थींना सामावून घेण्यात यावे.
- शिबिरा दरम्यान अपेय पान/व्यसन वर्ज्य आहे, तसेच ग्रामस्थांना त्रास होईल इतक्या मोठया आवाजात गाणी/वाजवणे नसावे.
- शिबिरापूर्वी महाविद्यालय स्तरावर शिबिर दैनंदिन उपक्रमाचे योग्य नियोजन करावे.
- शिबिर स्थळ व उपक्रमांविषयी, सहभागी विद्यार्थी व यांचे पालक यांना अवगत करावे. तसेच सर्वसहभागी शिबिरार्थीच्या पालकांचे संमती पत्र घावे.
- शिबिरा दरम्यान काही अनाहूत घटना घडल्यास त्वरीत महाविद्यालयाचे प्राचार्य यांना अवगत करणे व त्याचे सहमतीने योग्य तो निर्णय घ्यावा.
- महाविद्यालयीने विद्यापीठास लेखी न कळविता आयोजित शिबिर किंवा सात दिवसापेक्षा कमी कालावधीचे शिबिरे किंवा अनिवासी शिबिर विद्यापीठ रासेयो विभागाकडून नामंजूर करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.
- शिबिर आयोजनासाठी रासेयो संहितेचा (NSS Manual) वापर करण्यात यावा.
- मुला मुलींची राहण्याची व्यवस्था स्वतंत्र असावी.
- पहिल्या दिवशी दुपारच्या जेवणापूर्वी सर्व शिबिरार्थी शिबिर स्थळी उपस्थित असावेत तसेच शेवटच्या दिवशी जेवणानंतर शिबिर समारोप करण्यात यावा.
- प्रथमोपचार पेटी स्थानिक PHC/ वैद्यकिय अधिकारी यांचे संपर्क क्रमांक शिबिरस्थळी असावेत.
- अंघोळीसाठी मुलांना नदी/विहिरीत उतरण्यास मनाई करण्यात यावी.

**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.**

एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-400 001.

ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.022-22679565

**क्रमांक: रासेयो-202४/प्र.क्र.75/रासेयो कक्ष** **दिनांक: 3 डिसेंबर, 202४**

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**

रासेयो संलग्नित, सर्व विद्यापीठे / संचालनालये

**विषय : सन २०२4-२5 मधील विशेष शिबिरांच्या आयोजनाबाबत.**

संदर्भ: १) शासन निर्णय क्रमांक रासेयो-२०२३/प्र.क्र.१००/साशि-७ दि. १७.०५.२०२३

२) शासन निर्णय क्रमांक रासेयो-२०२३/प्र.क्र. १०९/साशि-७ दि.१७.०५.२०२३

३) वार्षिक कृती आराखडा अमलबजावणी बाबतचे या कार्यालयकडील पत्र क्रमांक - रासेयो-२०२४/प्र क्र ३५/ रासेयो कक्ष दि. ७ ऑक्टोबर २०२४

४) या कार्यालयकडील पत्र क्रमांक: रासेयो-202४/प्र.क्र.७४/ रासेयो कक्ष

५) राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे यांच्याकडील पत्र क्रमांक जा क्र. राकुकका/बाल आरोग्य/एनएनएस विशेष शिबिर आयोजन/ ५३३७८-४५०/२०२४ / दिनांक २५/११/2024

उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ अन्वये राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत वार्षिक सात दिवसीय विशेष शिबिरांचे आयोजन दि. ०१.११.२०२4 ते ३१.०१.२०२5 या कालावधीत करण्यात यावे असे कळविण्यात आलेले आहे. सन २०२4-२5 मध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करत असताना यावर्षासाठी रासेयो कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात आलेली थीम "Youth for My Bharat" व "Youth for Digital Literacy" ची अमंलबजावणी करणे तसेच या विशेष शिबिरांमध्ये संदर्भ क्रमांक ३ नुसार गाव स्तरावर शोष खड्डे/ पाझर खड्डे तयार करणे, बाल विवाह रोखण्यासाठी समाजप्रबोधन करणे, शिबिरातील सहभागी युवकांची तसेच गावातील किशोरवयीन मुला- मुलींची अनेमिया (रक्तक्षय) बाबत तपासणी करणे इत्यादि विशेष कृती कार्यक्रम राबवण्यात यावेत असे कळविण्यात आलेले आहे.

विशेष शिबिरांमध्ये सहभागी युवकांची तसेच गावातील किशोरवयीन मुला- मुलींची अनेमिया (रक्तक्षय) बाबत तपासणी करणेकरिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करण्याबाबत मा. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण माताबाल संगोपन व शालेय आरोग्य यांनी उपरोक्त संदर्भ क्रमांक ५ अन्वये सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (जिल्हा परिषद) आणि जिल्हा शल्य चिकित्सक यांना कळविले आहे. सोबत आरोग्य विभागाचे पत्र पाठवत आहे.

याबाबत आपणास सूचित करण्यात येत आहे की आपण आपल्या स्तरावरून सर्व कार्यक्रम अधिकारी यांना राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत वार्षिक सात दिवसीय विशेष शिबिरांमध्ये आरोग्य विभागाच्या सहकार्याने शिबिरांमध्ये सहभागी युवकांची तसेच गावातील किशोरवयीन मुला- मुलींची अनेमिया (रक्तक्षय) बाबत तपासणी करून घ्यावी व त्याबाबतचा अहवाल खालील प्रपत्रामध्ये याकार्यालयास सादर करावा.

## रासेयो विशेष शिबिरांमध्ये अनेमिया (रक्तक्षय) तपासणी

**विद्यापीठाचे नाव** :-

**महाविद्यालयाचे नाव** :-

**विशेष शिबिर आयोजित करण्यात आलेल्या गावाचे नाव**:-

**तालुका**: - **जिल्हा**: -

**दिनांक** : -

| अ. क्र. | अनेमिया (रक्तक्षय) तपासणी करण्यात आलेल्या युवक/युवतीचे नाव | स्त्री/ पुरुष | वय | पत्ता | संपर्क क्रमांक | रक्त गट | अनेमिया (रक्तक्षय) टेस्ट रीपोर्ट हिमोग्लोबिन ((gm/dL) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

सोबत:- राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे महाराष्ट्र राज्य यांचे पत्र.

(**डॉ. निलेश पाठक**)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी

**प्रत**:- **माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित**

1.रासेयो क्षेत्रिय संचालक,रासेयो क्षेत्रिय संचालनालय, पुणे

# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
**महाराष्ट्र राज्य**

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक दूरध्वनी क्रमांक (वै) –<br>कार्यालय दूरध्वनी क्र. – | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११ ००१. Email ID: spm.pune1@gmail.com |
| **आरोग्य सेवा** | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य/कक्ष १५क/NSS विशेष शिबिर आयोजन/ 53378-450/२०२४ दिनांक: 25/11/२०२४ |

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद.............. सर्व

जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय.......... सर्व

**विषयः राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत अंतर्गत शिबिरांमध्ये किशोरवयीन मुला मुलींची रक्तक्षय तपासणी करणेबाबत**

**संदर्भः** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुबई यांचे जाक रासेया-२०२४/प्र.क्र.७४/ररोयो कक्ष/ दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये राष्ट्रीय सेवा योजना संलग्नित विद्यापीठ/संचालनालय अंतर्गत प्रत्येक महाविद्यालयातर्फे वर्षातून एकदा सात दिवसांचे निवासी विशेष शिवीर महाविद्यालयीन दत्तक घेतलेल्या गावी नोव्हेंबर ते जानेवारी या हिवाळा ऋतू मध्ये आयोजित करण्यात येते. दरवर्षीप्रमाणे सन २०२४-२०२५ मधील राष्ट्रीय सेवा योजनाअंतर्गत वार्षिक सात दिवसीय विशेष शिबिरांचे आयोजन दि. ०१/११/२०२४ ते ३१/०१/२०२५ या कालावधीत करण्यात येणार आहे.

या वार्षिक सात दिवसीय विशेष शिबिरांमध्ये शिबिरातील सहभागी युवकांची तसेच गावातील किशोरवयीन मुला- मुलीची अनेमिया (रक्तक्षय) बावत तपासणी करणे हा विशेष कृती कार्यक्रम राबवण्यात येणार आहेत. या संदर्भात शिबीर समन्वयक यांच्याकडून प्राप्त होणा-या विनंती अर्जानुसार शिबीरातील सहभागी विदयार्थी तसेच शिबीर आयोजित गावातील किशोरवयीन मुला-मुलींचे अनेमिया (रक्तक्षय) तपासणी ॲनिमीया मुक्त भारत कार्यक्रमातील मार्गदर्शक सुचना नुसार त्या कार्यक्षेत्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत अनेनिया (रक्तक्षय) तपासणी व उपचार करण्यात यावी.

याकरीता आपल्या अधिनस्थ वैदयकिय अधिकारी/ वैदयकिय अधिक्षक (आ.आ. केंद्र/ग्रारु/उपजिल्हा रुग्णालय/जिल्हा रुग्णालय) यांना आपल्या स्तरावरुन आदेशीत करण्यात यावे तसेच केलेल्या स्क्रीनिगचा अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा

सोबत जिल्हा निहाय राष्ट्रीय सेवा योजना शिबीर समन्वयकांची नावे व संपर्क क्रमांक देण्यात आलेले आहेत.

(डॉ. बबीता कमलापुरकर)
**अतिरीक्त संचालक, आरोग्य सेवा,**
**कुटुंब कल्याण माताबाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे**

**प्रत माहितीस्तव**

राज्य संपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

**प्रत सविनय सादर -**

१) मा. अपर मुख्य सचिव, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

२) मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

३) मा. संचालक आरोग्य सेवा,आयुक्तालय, पुणे.

Scanned with OKEN Scanner